महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग, दालन क्र. ४६० (विस्तार), ४ था मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दूरध्वनी क्र. २२७९४३२४ ०२२ Email ID : deskf11.rev-mh@gov.in

---

क्रमांक:- सावव‍ि-२०२५/प्र.क्र.१०(LB)/फ-११ दिनांक:- २४ मार्च, २०२५

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख),नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), पुणे.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), नागपूर.
४) सर्व मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक (प्रादेशिक/ सामाजिक).

**विषय:**- अभिसरण योजनेच्या (Top-Up Model) अंमलबजावणी संदर्भातील बैठक.
**संदर्भ :** १. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख),नागपूर यांचे दि.३१.०१.०२५ रोजीचे पत्र व दि.१७.०२.२०२५ रोजीचे अ.शा. पत्र.
२. शासनाचे सम क्रमांक दि.०७.०३.२०२५ रोजीचे पत्र.

विषयांकित प्रकरणी अपर मुख्य सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली दि.११.०३.२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीस प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), पुणे, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), नागपूर व इतर क्षेत्रीय अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

२४/०३/२५
(प्रताप सातपुते)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

पत्र क्र. सावनि-२०२५/प्र.क्र.१०(LB)/फ-११, दि. २४ मार्च, २०२५ रोजीचे सहपत्र.

## बैठकीचे इतिवृत्त

### विषय:-अभिसरण योजनेच्या अंमलबजावणी संदर्भातील बैठक

अपर मुख्य सचिव (वने) यांचे अध्यक्षतेखाली दि.११.०३.२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता अभिसरण योजनेच्या (Top-Up Model ) अंमलबजावणी संदर्भात, तसेच सन २०२५ च्या पावसाळ्यात घेण्यात येणाऱ्या रोपवन कामांबाबत व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), पुणे, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), नागपूर व इतर क्षेत्रीय अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत चर्चेअंती अपर मुख्य सचिव (वने) यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले:-

| अ.क्र. | चर्चेचा मुद्दा | अ.मु.स(वने) यांचे निर्देश |
|---|---|---|
| १. | अभिसरण योजनेच्या (Top-Up Model) अंमलबजावणी संदर्भात | मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांच्या दि.३१.०१.२०२५ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने बदल करण्याचे झाल्यास नियोजन विभाग, रोहयो प्रभाग व वित्त विभाग यांचे अभिप्रायासह मा.मंत्रिमंडळाची मान्यता घ्यावी लागणार आहे. त्यासाठी काही कालावधीची आवश्यकता आहे. सद्य:स्थितीत सन २०२५ मधील पुर्व पावसाळी कामे करण्यास अत्यंत कमी कालावधी शिल्लक असल्याने, अभिसरणांतर्गत कार्यवाही सुरू ठेवून रोपवनाची कामे पुर्ण करण्यात यावीत. सन २०२४ मध्ये करण्यात आलेल्या अंदाजे ५० लक्ष रोपवनाच्या कामांच्या धरतीवर सन २०२५ करीता कार्यवाही करण्यात यावी. |
| २. | अभिसरणांतर्गत (Top-up Model) सन २०२५ च्या पावसाळ्यात घेण्यात येणाऱ्या रोपवन कामाबाबत. | शासन परिपत्रक दि.०४.०३.२०२४ अन्वये सन २०२४ च्या पावसाळ्यामध्ये अभिसरणांतर्गत पुर्व पावसाळी कामांतील गुरे प्रतिबंधक चर खोदणे, खड्डे खोदणे व समतल चर खोदणे या तीन कामांकरीता देण्यात आलेल्या मुभेप्रमाणे सन २०२५ च्या पावसाळ्यातील रोपवनाच्या पूर्व पावसाळी कामांना मुभा देण्याबाबत कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे. |

बैठकीच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे घोषीत करण्यात आले.

*******